सं.फौ.प्र.क्र.३९७/२०२३

**निशाणी क्रमांक १ खाली**

**फिर्यादीचे/साक्षीदाराचे सत्यापण (Verification)**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

माझे नांव :– बाळु पि. कारभारी गायकवाड,

वय सुमारे :– ३७ वर्षे, व्यवसाय – शेती,

निवासस्थान :– दरेगांव, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद,

घटना दिनांक १९/१२/२०२३ रोजी रात्री ९.३० वा.चे सुमारास मौजे दरेगांव येथील गट क्र.२८७ मध्ये माझ्या शेताजवळ घडली. त्याआगोदर दिनांक १८/१२/२०२३ रोजी मी माझे शेतामधील असलेल्या घरासमोरील शेडमध्ये मोबाईलवर पाहत असतांनी त्याठिकाणी आरोपी रायभान शंकर गायकवाड हा घराजवळ आला व मला माझ्या घरातील लोकांना जोर जोराने शिवीगाळ करु लागला. त्यानंतर मी त्याला बऱ्याचवेळा समाजावुन सांगत होतो. परंतु आरोपी त्याची शिवीगाळ करने थांबवत नव्हता. त्यांनतर आरोपी हा त्याच्या घरी गेला व घरातुन कुऱ्हाड घेवुन आला व मला जिवे मारण्याच्या उद्दशाने माझ्या अंगावर धावुन आला व मला कुऱ्हाडीने मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मी सदर घटनेबद्दल बाजार सांवगी पोलीस चौकी येथे तक्रार देण्यासाठी गेला असता तेथील पोलीसांनी मला खुलताबाद पो.स्टे.ला जाऊन तक्रार देण्याचे सांगितले. त्यामुळे मी आरोपीविरुद्ध खुलताबाद पोलीस ठाण्यात एन.सी. क्र. ९१४/२०२३, कलम ५०४ व ५०६ अशा स्वरुपाचा गुन्हा दाखल केला. परंतु पोलीसांनी काहीएक कार्यवाही केली नाही. मला न्याय मिळावा म्हणुन मी आज रोजी न्यायालयात जबाब देण्यासाठी आलो आहे. या व्यतीरीक्त मला काहीएक सांगायचे नाही.

स्वाक्षरीत/–                                        श्रवणोत्तर स्वीकृत,

फिर्यादीची स्वाक्षरी/अंगठा                          स्वाक्षरीत/–

(डॉ. एस.व्ही.राजकुंटवार)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

दिनांकः– २१/०३/२०२४                              खुलताबाद